कर्ज वसुली न्यायाधिकरण
क्र. II मध्ये
३ रा मजला, एमटीएनएल भवन, कुलाबा मार्केट, कुलाबा, मुंबई – ४०० ००५
मूळ अर्ज क्र. १२१ सन २०१९
समन्स

नि. क्र. १०
डॉएच्च बँक
...अर्जदार

विरुद्ध
व्ही. जी. शिपब्रेकर्स प्रा. लि. आणि इतर
...प्रतिवादी

१. ज्याअर्थी वरील नमूद अर्जदार यांनी त्यातील नमूद विद्यमान आणि भविष्यातील व्याज, खर्च आणि इतर अनुतोषांसह एकत्रित रकमेच्या वसुलीकरिता सदर न्यायाधिकरणासमक्ष वरील नमूद अर्ज दाखल केला आहे.
२. ज्याअर्थी साधारण स्वरुपात समन्सची बजावणी परिणामकारक होऊ शकली नाही आणि ज्याअर्थी सदर सन्मा. न्यायाधिकरणाद्वारे दुय्यम बजावणीकरिता अर्ज संमत करण्यात आला आहे.
३. तुम्हाला सदर न्यायाधिकरणासमक्ष व्यक्तिशः वा वकिलाद्वारे लेखी विवरणपत्र/म्हणणे दाखल करण्यासाठी आणि आज्ञेप्रमाणे अनुतोष का संमत करण्यात आला नाही याची कारणे दर्शविण्यासाठी दि. **२०.०१.२०२० रोजी स. ११.०० वा.** उपस्थित राहण्याचे निर्देश दिले आहेत.
४. सूचना घ्यावी की, कसूरवार ठरल्यास, तुमच्या अनुपस्थितीत अर्जाची सुनावणी होईल आणि निर्धारित असेल.
माझ्या हस्ते आणि सदर न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने **१८ नोव्हेंबर, २०१९** रोजी दिली/निर्गमित.

प्रभारी प्रबंधक,
डीआरटी–II, मुंबई

सर्व प्रतिवादींचे नाव आणि पत्ता:
२. गौरव अनिल प्रजापती (संचालक) येथे २०४/१९, जयजलाराम इमारत, सिताराम प्रकाश हायस्कूल समोर, वडाळा, मुंबई – ४०० ०३१
३. अनिलकुमार विश्वनाथ प्रजापती (संचालक) येथे २०४/१९, जयजलाराम इमारत, सिताराम प्रकाश हायस्कूल समोर, वडाळा, मुंबई – ४०० ०३१

मनविजय डेव्हलपमेंट कंपनी लिमिटेड

(सीआयएनःएल४५२०८एमएच१९८२पीएलसी२६४०४२)
नोंद. कार्यालय : ७०१, ७ वा मजला, प्लॉट–९६/९८, प्लॉटिनम आर्केड, जेएसएस रोड, सेंट्रल प्लाझा सिनेमा, चर्नी रोड, गिरगाव, मुंबई–४०० ००४.
कॉर्पो. कार्यालय : सी–२२२, जीआयडीसी मकरपुरा इंडस्ट्रियल इस्टेट, वडोदरा–३९००१०
ई–मेल आयडी : manvijaydcl@manvijay.com वेबसाईट : www.manvijay.com, दू. क्र.:९७२७७५५०८३

विशेष सर्वसाधारण सभेची (ईओजीएम) सूचना आणि रिमोट ई–व्होटिंगची माहिती

याद्वारे सूचना देण्यात येते की, **मनविजय डेव्हलपमेंट कंपनी लिमिटेडची** विशेष सर्वसाधारण सभा (ईओजीएम) कंपनीच्या कॉर्पोरेट कार्यालयात सी–२२२, जीआयडीसी मकरपुरा इंडस्ट्रीयल इस्टेट, वडोदरा–३९००१० येथे शनिवार, १८ जानेवारी, २०२० रोजी स. ११.०० वा. सभासदांना पाठवलेल्या ईओजीएम निमंत्रणाच्या सूचनेत नमूद केलेले कामकाज करण्यासाठी होईल. ईओजीएम सूचनेच्या प्रती, दळणवळणाच्या कारणास्तव ज्यांनी त्यांचे ई–मेल अ‍ॅड्रेस कंपनी/डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सकडे नोंदवलेले आहेत त्या सर्व सभासदांना इलेक्ट्रॉनिक माध्यमातून पाठवल्या आहेत. ०६ डिसेंबर, २०१९ रोजीस सभासदांच्या नोंदवहीत/सीडीएसएल/एनएसडीएलकडून प्राप्त झालेल्या लाभार्थी मालकांच्या सूचीत ज्यांची नावे आढळली त्या सर्व कंपनीच्या भागधारकांना ईओजीएमची सूचना पाठविण्याचे कम कंपनीने १८ डिसेंबर, २०१९ रोजी पूर्ण केले. सभासदांना जर ईओजीएमची सूचना मिळाली नसेल तर manvijaydcl@manvijay.com येथे कंपनीला लेखी कळवून त्यांची एक प्रत मिळवता येईल.
कंपनी अधिनियम, २०१३ चे कलम १०८ आणि सहवाचता कंपन्यांचे (व्यवस्थापन आणि प्रशासन) सुधारण नियम, २०१५ ने सुधारित कंपन्यांचे (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ चा नियम २० आणि ''एलओडीआर'' च्या रेग्युलेशन ४४ ला अनुसरून कंपनीने इलेक्ट्रॉनिक माध्यमातून ईओजीएमच्या सूचनेत मांडलेले कामकाज करण्यासाठी तिच्या सभासदांना ई–व्होटिंग सुविधा देण्याकरिता नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल) ची नेमणूक केली आहे. सभासदांना याद्वारे कळविण्यात येते, की :
(i) रिमोट ई–व्होटिंगचा कालावधी बुधवार, १५ जानेवारी, २०२० रोजी स. ९.०० वा. सुरु होईल आणि शुक्रवार, १७ जानेवारी, २०२० रोजी. सं. ५.०० वा. संपेल. त्यानंतर एनएसडीएलकडून ई–व्होटिंग मॉड्युल निष्क्रिय केलं जाईल.
ii) रिमोट ई–व्होटिंग आणि ईओजीएम मध्ये मतदान करण्याकरिता सभासदांनी पात्रता ठरविण्यासाठी कट–ऑफ डेट आहे शनिवार, ११ जानेवारी, २०२०.
iii) कोणतीही व्यक्ती सभेची सूचना पाठवल्यानंतर कंपनीची सभासद बनली आणि शनिवार, ११ जानेवारी, २०२० ह्या कट–ऑफ डेट रोजीस शेअर्स धारण करत असेल ती evoting@nsdl.co.in येथे मेल पाठवून किंवा एनएसडीएलशी टोल फ्री नं. १८००–२२२–९९० वर संपर्क साधून युजर आयडी आणि पासवर्ड मिळवू शकते.
iv) ईओजीएमला जे हजर आहेत आणि रिमोट ई–व्होटिंगने आधीच त्यांचे मत न दिलेल्या सभासदांकरिता मत पत्रिकेमार्फत मतदान उपलब्ध आहे. ज्या सभासदांनी रिमोट ई–व्होटिंगने त्यांचे मत दिले असेल ते देखील ईओजीएमला हजर राहू शकतात परंतु पुन्हा त्यांचे मत देण्यात ते हक्कदार नसतील.
v) केवळ कट ऑफ डेट रोजीस सभासदांच्या नोंदवहीत किंवा डिपॉझिटरीज ठेवत असलेल्या लाभार्थी मालकांच्या नोंदवहीत ज्यांचे नाव असले ती व्यक्तीच रिमोट–ई व्होटिंगची सुविधा घेण्यास व मत पत्रिकेमार्फत ईओजीएम मध्ये मतदान करण्यास हक्कदार असेल.
vi) विशेष सर्वसाधारण सभेची सूचना कंपनीची वेबसाईट www.manvijay.com वर अणि रिमोट ई–व्होटिंग एजन्सी एनएसडीएलची वेबसाईट www.evoting.nsdl.com वर उपलब्ध आहे.
vii) रिमोट ई–व्होटिंग वरील कोणत्याही चौकशीच्या बाबतीत कृपया एक ई–मेल तुमचा फोलिओ क्र./डीपी आयडी आणि क्लायंट आयडी नमूद करून evoting.nsdl.co.in वर पाठवावा.

मनविजय डेव्हलपमेंट कंपनी लिमिटेडसाठी
यतीन संजय गुप्ते
दिनांक : १९/१२/२०१९ **व्यवस्थापकीय संचालक**
ठिकाण : वडोदरा **डीआयएनः०७२६११५०**

जाहीर सूचना

याद्वारे **सूचना** देण्यात येते की, आम्ही **जॉन्सन अ‍ॅण्ड जॉन्सन प्रायव्हेट लिमिटेड,** कंपनी अ‍ॅक्ट, १९५६ मध्ये नोंदणीकृत कंपनी आणि आता कंपनीज अ‍ॅक्ट, २०१३ अन्वये मानलेली कंपनी ज्यांचे नोंदणीकृत कार्यालय येथे जॉन्सन अ‍ॅण्ड जॉन्सन प्रायव्हेट लिमिटेड, एल. बी. एस. मार्ग, मुलुंड (प.), मुंबई – ४०००८० यांचे खालील **परिशिष्टात** तपशीलवारपणे खाली नमूद केलेल्या मिळकतीसंदर्भात नामाधिकार तपासत आहोत.
सर्व व्यक्ती/संस्था यांना खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतीसंदर्भात किंवा त्याच्या कोणत्याही भागासंदर्भात विक्री, अदलाबदल, भाड्याने, भाडेपट्टा, पोट–भाडेपट्टा, परवाना, लिव्ह अ‍ॅण्ड लायसन्स, काळजीवाहू तत्वावर, कुळवहिवाट, पोट–कुळवहिवाट, अभिहस्तांकन, सोडून देणे, रिलिक्विशमेंट, गहाण, वारसा, जप्ती, उत्तराधिकार, भेट, धारणाधिकार, प्रभार, देखभाल, सुविधाधिकार, विश्वस्त, म्युनिमेंट, भोगवटा, कब्जा, कौटुंबिक व्यवस्था/तडजोड, कोणत्याही कराराद्वारे कोणत्याही मार्गे किंवा खटला, विलेख, दस्तावेज, लिखित, अभिहस्तांतरण विलेख, निधन, कोणताही न्यायालयीन आदेश किंवा हुकूम, कंत्राट/करार, विकासाधिकार, भागीदारी, एफएसआय कन्झप्शन किंवा प्रभार किंवा याशिवाय कसेही च्या मार्गे शेअर, अधिकार, नामाधिकार, दावा, आक्षेप, फायदा, मागणी आणि/किंवा हितसंबंध असल्यास लिखित स्वरुपात कागदपत्रीय पुराव्यांसह निम्नस्वाक्षरीकारांना खाली दिलेल्या पत्त्यावर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून **दहा (१०) दिवसां**च्या आत पाठविणे. दावे पाठविण्यास कसूर केल्यास ते सोडून दिल्याचे, माफ केल्याचे आणि/किंवा त्यागल्याचे समजण्यात येतील. जाहीर सूचनेचा प्रतिसाद म्हणून केलेल्या सर्व दाव्यांमध्ये **ए०२८२** हा संदर्भ क्रमांक वापरावा.

वरील उल्लेखित परिशिष्टः
बृहन्मुंबई मध्ये मुंबई शहर आणि मुंबई उपनगरच्या नोंदणीकृत जिल्हा आणि उप–जिल्हा मध्ये गाव जुहू येथे स्थित जमीन धारक सी.टी.एस. क्र. १०४९ आणि धारक सर्व्हे क्र. ७१ (भाग) च्या प्लॉट चा उर्वरित भाग एकत्रित खाजगी प्लॉट क्र. ३ ते ९, मोजमापित ३१,६९३.०५ चौ.मीटर्स किंवा तत्समची जमीन आणि मैदानाच्या सर्व त्या भाग आणि विभागावर उभी मेकर कुंदन गार्डन्स नावे ज्ञात कॉम्प्लेक्सचा टॉवर ए मध्ये ४ थ्या मजल्यावर फ्लॅट क्र. ४२ सह कव्हर्ड कार पार्किंग जागा क्र. ४ मधील **सर्व ते** अधिकार, नामाधिकार आणि हितसंबंध.
१९ डिसेंबर, २०१९ ला दिनांकीत.

साजित सुवर्णा
भागीदार
डीएसके लिगल
वकील आणि सॉलिसिटर्स
१२०३, वन इंडियाबुल्स सेंटर
टॉवर २, मजला १२ बी
८४१, सेनापती बापट मार्ग,
एल्फिन्स्टन रोड, मुंबई – ४०० ०१३

TATA

TATA STEEL LIMITED
Registered Office: Bombay House, 24, Homi Mody Street, Fort, Mumbai - 400 001, India
Tel.: +91 22 6665 8282 Fax No.: +91 22 6665 7724
Email: cosec@tatasteel.com Website: www.tatasteel.com
CIN: L27100MH1907PLC000260

सूचना

कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम ९१ आणि कंपन्यांचे (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ च्या नियम १०(१) ला अनुसरून याद्वारे सूचना देण्यात येते की, प्रायव्हेट प्लेसमेंट बेसिसवर जारी केलेल्या आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या होलसेल डेब्ट मार्केट सेगमेंटवर सूचिबध्द असलेल्या नॉन–कन्व्हर्टीबल डिबेंचर्स वरील व्याज खालील प्रमाणे देय आहे.

अनु. क्र.	नॉन–कन्व्हर्टीबल डिबेंचर्स (एनसीडीज)	व्याजाची नियत तारीख	व्याज प्रदानासाठी रेकॉर्ड डेट
१.	एकूण ₹ २,५०० कोटींचे ६ जानेवारी, २०११ रोजी जारी केलेले १०.२५% एनसीडीज (ISIN:INE081A08157)	६ जानेवारी, २०२०	३१ डिसेंबर, २०१९

टाटा स्टील लिमिटेड
सही/–
पार्वथीसम कांचीनाधम
१८ डिसेंबर, २०१९ कंपनी सेक्रेटरी अँड
मुंबई चीफ लिगल ऑफिसर (कॉर्पोरेट अँड कॉम्प्लायन्स)
TATA STEEL

जिल्हा उप–प्रबंधक, को–ऑपरेटिव्ह सोसायटीज, मुंबई शहर (३) सक्षम प्राधिकरण.
महाराष्ट्र ओनरशीप फ्लॅटस् अ‍ॅक्ट, १९६३ च्या कलम ५ ए अन्वये
म्हाडा इमारत, तळमजला, कक्ष क्र. ६९, बांद्रा (पू.), मुंबई ४०००५१
मोफा (नियम ११(९)(ई)) च्या फॉर्म XIII मधील जाहीर सूचना, सक्षम प्राधिकरणासमोर
अर्ज क्र. १६९ सन २०१९

श्री गोपिनाथ कृपा सी.एच.एस. लि.,
प्लॉट क्र. ४०, मनिष नगर, जयप्रकाश रोड, चार बंगला,
अंधेरी (प.), मुंबई– ४०००५३. **...अर्जदार**

विरुध्द
१. जिम रुसदिन प्रायव्हेट लिमिटेड,
१६ ए, अल्टामाऊंट रोड, कंबाला हिल, मुंबई– ४०००२६.
२. मे. माला एंटरप्रायझेस,
२४, वीर नरिमन रोड, फोर्ट, मुंबई– ४०००२३. **...प्रतिवादी**

जाहीर सूचना
सूचना घ्यावी की, उपरोल्लेखित प्रतिवादींच्या विरोधात महाराष्ट्र ओनरशीप फ्लॅटस् (रेग्युलेशन ऑफ द प्रमोशन ऑफ कन्स्ट्रक्शन, सेल, मॅनेजमेंट अ‍ॅण्ड ट्रान्सफर) अ‍ॅक्ट, १९६३ च्या कलम ११ आणि प्रयोज्य नियमान्वये अर्जदारांनी वरील अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदारांनी अर्जदार सोसायटीच्या नावे प्लॉट क्र. ४०, मनिष नगर, जयप्रकाश रोड (चार बंगला), अंधेरी (पश्चिम), मुंबई– ४०००५३ असा पत्ता असलेल्या गाव आंबेवली, तालुका अंधेरी, मुंबई उपनगर जिल्हा येथील सदर इमारतीसह सी.टी.एस. क्र. ८२६–ए आणि ८२७–ए मोजमापित २४२८ चौ. मी. धारक जमिनीच्या एकतर्फी अभिहस्तांकनाच्या हक्कदाराची प्रमाणपत्र मंजुर करण्याची विनंती केली आहे.
१) वरील प्रकरणाची सुनावणी **०२/०१/२०२० रोजी दु. ३.३० वा.** निश्चित करण्यात आली आहे.
२) प्रवर्तक/प्रतिवादी आणि असल्यास त्यांचे कायदेशीर वारस किंवा कोणी अन्य व्यक्ती/ प्राधिकरण कोणताही आक्षेप सादर करण्यास इच्छुक असल्यास त्यांनी व्यक्तिशः किंवा अधिकृत प्रतिनिधीमार्फत **०२/०१/२०२० रोजी दु. ३.३० वा.** निम्नस्वाक्षरीकारांसमक्ष वरील प्रकरणाविरुध्द त्याच्या/तिच्या आक्षेप/दावा/मागणीच्या पुष्ठ्यर्थ त्याला/तिला/त्यांना सादर करावयाच्या कोणत्याही दस्तावेजांसह एकत्रित हजर रहावे आणि अर्जदारांना सल्ला देण्यात येतो की, इच्छुक पक्षकारांद्वारे कोणतेही लेखी उत्तर दिले तर ते प्राप्त करण्यासाठी त्यावेळी हजर रहावे.
३) जर कोणी इच्छुक व्यक्ती सदर सूचनेद्वारे आवश्यक असल्याप्रमाणे हजर राहण्यास किंवा लेखी उत्तर देण्यास असमर्थ ठरल्यास त्याच्या गैरहजेरीत प्रकरण/अर्जातल्या प्रश्नावर निकाल देण्यात येईल आणि अशा व्यक्तींना मंजूर केलेल्या अभिहस्तांतर/घोषणा/आदेश ज्यासाठी मिळकतीविरोधात किंवा अर्जदारांना मंजूर केलेल्या सोसायटीच्या नोंदणीसाठीच्या निर्देशांविरुध्द किंवा अशा इच्छुक पक्षाविरुध्द पारित होणाऱ्या कोणत्याही आदेश/ प्रमाणपत्र/निवाड्याविरुध्द कोणताही दावा, आक्षेप किंवा मागणी करता येणार नाही आणि प्रकरणावर एकतर्फी सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आदेशाने
ठिकाण : मुंबई **जिल्हा उप–प्रबंधकांकरिता, को–ऑपरेटिव्ह सोसायटीज, मुंबई शहर (३)**
दिनांक : १८.१२.२०१९ **सक्षम प्राधिकरण, मोफा, १९६३ च्या कलम ५ ए अन्वये**

जाहीर सूचना

आमचे अशिल कोटक महिन्द्रा इन्व्हेस्टमेन्ट लिमिटेड (``**केएमआयएल**'') यांच्या वतीने सदर नोटीस देण्यात येत आहे कि आम्ही खालील **अनुसूचीमध्ये** वर्णन केलेल्या मिळकतीच्या ("**मिळकत**") संदर्भात मे. अवेन्ता प्रॉपर्टीज एलएलपी (``**मालक**") यांच्या हक्कांची चौकशी करीत आहोत. मे. अवेन्ता प्रॉपर्टीज एलएलपी ही एक मर्यादित दायित्व भागीदारी कंपनी असून ती मर्यादित दायित्व भागीदारी कायदा २००८ अतंर्गत नोंदणीकृत झालेली आहे आणि तीचे नोंदणीकृत कार्यालय ३ अे/बी, राजाबहादुर मेन्शन, २०, अंबालाल दोशी मार्ग, फोर्ट, मुंबई- ४०० ०२३ येथे आहे. सदर मिळकत केएमआयएल यांच्या फायदयासाठी तारण ठेवण्याचा मालक यांचा हेतु आहे.
कोणाही व्यक्तीचा (मग ते व्यक्ती, एक हिंदु अविभाजीत कुटुंब, भागीदारीसंस्था, व्यक्तींची संघटना, व्यक्तींची संस्था, अंतर्भूत संस्था असो) कुठल्याही प्रकारे दावा व/वा मागणी सदर मालमत्ते बाबत / मालमत्तेवर/मालमत्ते संदर्भात किंवा तीच्या संभाव्या विकासासंदर्भात किंवा मालकांचे सदर मालमत्तेमधील वा तीच्या कोणत्याही हिश्याबाबत त्यांचे हक्क, शीर्षक आणि हीत बाधीत होत असेल, मग ते वारसा, गहाण, विक्री, विकासहक्क, संभाव्या विकासाचा उपयोग करण्याचा अधिकार, विक्रीचा करार, हस्तांतरण, भाडेकरू, उप-भाडेकरू, ताबा, मालकी, असायनमेन्ट, भाडेपट्टा, उप-भाडेपट्टा, हिस्सा, धारणाधिकार, प्रभार, न्यास, उत्तराधिकार, देखभाल,सुविधाधिकार, रहदारीचा हक्क, भेट, विचाराधीन विवाद, भार, वारसाहक्क, सामंज्यस करार, समझोता, भागीदारी, कोणत्याही कोर्टाचे न्यायालय किंवा न्यायाधिकरण किंवा संबंधित प्राधिकरणाचे आदेश किंवा हुकूम, अदलाबदल, ताबा, वाटप, जप्ती, विकासाचे हक्क, एफएसआयचा वापर वा अन्य कोणत्याही स्वरूपातील भार वा बोजा (एकत्रितपणे " **दावे**") असल्यास तर त्यांनी खालील अधोहस्तांक्षिताना, खैतान अ‍ॅन्ड कं., वकील, वन इंडियाबुल्स सेंटर, १३वा मजला, टॉवर १, ८४१, सेनापती बापट मार्ग, मुंबई - ४०० ०१३ येथे आवश्यक त्या सर्व कागदोपत्री पुराव्यासहीत या नोटीसीच्या प्रसिद्धी दिनांका पासून **७ (सात)** दिवसांच्या आत लिखित स्वरूपात सूचित करावे अन्यथा असे समजण्यात येईल की अश्या व्यक्तिंनी वा दावेदारांनी असे दावे सोडून दिलेले आहेत व/वा अश्या दाव्यांचा अधिकार व वापरण्याचा हक्क सोडून दिलेला आहे व ते दावे जरी अस्तितवात असल्यास तरी ते आमच्या अशिलावर बंधन कारक नसतील व आमचे अशिल अश्या दाव्यांचा, कोणत्याही संदर्भाविना व अडथळयाविना मालकासोबत मिळकती संदर्भात इच्छित व्यवहार पुर्ण करण्यास मुक्त असतील.

अनुसूची
(मालमत्तेचे विवरण)
मुंबई जिल्ह्याच्या विभागातील, माहिम मधील टीपीएस III, स्ट्रीट क्र. ६३२/६५२ येथील जमीनीचा सर्व तो भाग व भूखंड जे (i) २२७७.७९ चौ. मी. क्षेत्रफळ असलेला फायनल प्लॉट क्र. २०६ जीचा कॅडेस्टल सर्वे क्र. १९०३, १६८२, १६१३, ५२७ व ५२६ आणि (ii)१३७.२७ चौ. मी. क्षेत्रफळ असलेला फायनल प्लॉट क्र. २०७ जीचा कॅडेस्टल सर्वे क्र.१४८८ आणि त्यावरील सर्व असलेल्या बांधकामा सहीत, ज्याची चर्तुसिमा खालील प्रमाणे :

उत्तरे वा त्या दिशेस	:	माहिम येथील दादोबा जगन्नाथ ट्रस्ट यांची प्लॉट क्र. २०८ टीपीएस III वरील अंशत: मीळकत आणि अंशत: टी. कटारिया मार्ग आणि अंशत: प्लॉट क्र. २०७, माहिम टीपीएस III
दक्षिण वा त्या दिशेस	:	नगरपालिका मार्केट आणि धैर्यवान रिलीजीअस अ‍ॅन्ड चॅरिटेबल ट्रस्टची दुसरी मालमत्ता
पूर्व वा त्या दिशेस	:	गजानन मोरेश्वर जोशी यांची मालमत्ता
पश्चिम वा त्या दिशेस	:	लेडी जमशेदजी रोड

खेतान अ‍ॅन्ड कं. करीता
सही/ -
दिनांक : १९.१२.२०१९ **देवेंद्र दशमुख**
स्थान : मुंबई **भागीदार**

सी आर नं. २०

दिवाणी आणि सत्र न्यायालय, मुंबईमध्ये मुंबई येथे

एस.सी. सूट क्र. २०१९ चा ११०
(कोड ऑफ सिवील प्रोसीजर, १९०८ ची ऑर्डर V नियम २०)

२० डिसेंबर २०१८ रोजी सादर व दाखल करण्यात आलेली फिर्याद.
कोड ऑफ सिवील प्रोसीजर च्या कलम २७ O. V.r. १, ५, ७ आणि ८ आणि O. VIII r ९ अधीन दावापत्राला उत्तर देण्यासाठी समन्स

युको बँक, बँकिंग कंपनीज् (संपादन आणि उपक्रमांचे हस्तांतर) अधिनियम, १९७० अंतर्गत स्थापित एक बॉडी कॉर्पोरेट जिचे मुख्य कार्यालय १०, बिप्लबी त्रैलोक्य महाराज सारणी, कोलकाटा– ७००००१ येथे आहे), आणि तळ मजला, भारतीय विद्या भवन (विल्सन कॉलेजच्या मागे) चौपाटी बीचजवळ, पंडिता रमाबाई रोड, मुंबई – ४००००७ येथे असलेली युको बँक, चौपाटी शाखा म्हणून ज्ञात असलेली तिच्या इतर शाखा कार्यालयांपैकी एक, मार्फत श्री. अँथनी अरुण सुन्तार, अधिकृत अधिकारी ...वादी

विरुद्ध

मे. श्री कृष्ण एन्टरप्राइजेस्, एक मालकी हक्काची संस्था मार्फत श्री. एस.आर. देसाई, मालक सी ११४–११५, श्रेयस इंडस्ट्रियल इस्टेट, १ ला मजला, जयकोच नाक्याजवळ, गोरेगांव (पूर्व), मुंबई– ४०००६३, खोली क्र. २, चाळ क्र. १ गंगुबाई रामचंद्र लोके चाळ, शिव टेकडी, गुंफा रोड, जोगेश्वरी, मुंबई – ४०००६८ ...प्रतिवादी

प्रति,
मे. श्री कृष्णा एन्टरप्राइजेस्
उपरिनामित प्रतिवादी

ज्याअर्थी उपरिनामित वादीने, या ठिकाणी खाली दिल्याप्रमाणे तुमच्या विरुद्ध दावा दाखल केला आहे. ज्याविषयीचे संक्षिप्त प्रतिपादन पुढीलप्रमाणे आहे,
त्यामुळे वादी प्रार्थना करतोः
अ. प्रतिवादीला रु. ६,२४,८७३,.१८य– ची रक्कम, दावा दाखल केल्याच्या तारखेपासून प्रदानाच्या/वसूलीच्या तारखेपर्यंत मासिक अंतरासह दरसाल ८.६०% दराने व्याजासह प्रदान करण्यासाठी निर्देश देणे आणि त्यासाठी प्रकिवादीविरुद्ध हुकूम पारित करणे.
ब. वादीच्या दाव्याच्या वसूलीसाठी तारणगहाण मत्तांची विक्री करण्यासाठी निर्देश देणे.
क. प्रतिवादीला त्याच्या सर्व जंगम आणि स्थावर मत्ता आणि मालमत्तांची सूची शपथेवर सादर करण्यासाठी आणि दाव्याची सुनावणी आणि अंतिम विल्हेवाट प्रलंबित असताना टाच आणण्याचे निर्देश देणे.
ड. प्रतिवादीला विक्री, गहाण, भाडेपट्टा, परवाना, दान, अदलाबदल किंवा अन्यथा मार्गाने तृतीय पक्षीय हितसंबंध निर्माण करण्यास मनाई करणे आणि विद्यमान दाव्याची सुनावणी आणि अंतिम विल्हेवाट प्रलंबित असताना त्याच्या जंगम किंवा स्थावर मत्ता आणि मालमत्तांचा नाश करणे किंवा सोडून देण्यास प्रतिबंध करणे.
इ. प्रतिवादीला दाव्याचा खर्च देण्यासाठी निर्देश देणे.
फ. लायक आणि योग्य असू शकतील असे इतर आणि आणखी आदेश पारित करणे.
याद्वारे या आदरणीय न्यायालयात जानेवारी, २०२० च्या २० व्या दिवशी सकाळी ११.०० वाजता तुम्हाला किंवा दाव्याशी संबंधित सर्व वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तरे देण्यास सक्षम असलेल्या एखाद्या वकीलाद्वारे, किंवा उपरिनामित वादीच्या अशा सर्व प्रश्नांना उत्तर देण्यास सक्षम असेल अशा अन्य कोणत्याही व्यक्ती जोडीला अस णाऱ्या कोणाहीद्वारे हजर होण्यासाठी समन्स केले जात आहे आणि तुम्ही हजर होण्यासाठी निश्चीत केलेला दिवस दाव्याच्या अंतिम विल्हेवाटीसाठी नियुक्त करण्यात आलेला असल्यामुळे, तुम्ही त्या दिवशी सर्व साक्षीदार हजर केले पाहिजेत, आणि तुम्ही याद्वारे दखल घेणे आवश्यक आहे की पूर्वोक्त दिवशी तुम्ही हजर होण्यात कसूर करण्याच्या प्रसंगात, दाव्याची तुमच्या गैरहजेरीत सुनावणी केली जाईल आणि निकाल दिला जाईल आणि तुम्ही तुमच्याबरोबर आणाल किंवा वकीलाबरोबर पाठवाल तुमच्या ताब्यातील दस्तऐवज किंवा प्रतिवादीच्या प्रकरणाच्या गुणवत्तेशी संबंधित पुरावा असलेला अधिकार किंवा तुम्ही तुमच्या प्रकरणाच्या समर्थननार्थ ज्यावर अवलंबून राहू इच्छिता असा पुरावाः–
या आदरणीय न्यायालयाच्या सही आणि शिक्क्यानिशी दिले.
दिनांकित नोव्हेंबर २०१९ च्या या २८ व्या दिवशी

सही/–
निबंधकाकरिता
शहर दिवाणी न्यायालय मुंबई
राजकुमार के. शुक्ला लॉ फर्म
अ‍ॅडव्होकेटस् आणि कन्सल्टन्ट स्
वादीसाठी वकील
सही/–
सीलर
सील
ऑफिस क्र. १०, २ रा मजला, ८४, जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई – ४००००१
९१–९८३३६२५०९८ ०२२–२२८७६३९२ advshukla4@gmail.com

HDFC BANK

एचडीएफसी बँक लिमिटेड
पत्ताः एचडीएफसी बँक लि., १ ला मजला, अल्फा, आय थिंक टेक्नो कॅम्पस्, कांजुरमार्ग (पू), मुंबई–४०० ०४२

मागणी सूचना
(सिक्युरिटायझेशन अ‍ॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अ‍ॅसेटस् अ‍ॅन्ड एन्फोर्समेंट ऑफ दि सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, २००२ च्या कलम १३(२) अंतर्गत)

खालील कर्जदार आणि सहकर्जदार यांनी एचडीएफसी बँक लि. यांच्याकडून खालील नमूद तारण कर्जे घेतले आहे. खालील नमूद कर्जदार आणि सह–कर्जदार यांचे कर्ज त्यांची मिळकत तारण म्हणून गहाण ठेऊन घेतलेले आहे. संबंधित कर्ज करारातील अटी आणि शर्तींची पूर्तता करण्यात त्यांनी कसूर केली आणि अनियमित झाले आहेत, त्यामुळे त्यांचे कर्ज **आरबीआय**च्या मार्गदर्शक तत्त्वांद्वारे **एनपीएम**ध्ये वर्गीकृत करण्यात आले आहे. निर्गमित करण्यात आलेल्या सूचनेतील **एचडीएफसी बँक लि.** यांचे थकीत खालील नमूद सूचित वर्णन करण्यात आले आहे आणि सदर रकमेवरील पुढील व्याज लागू होतील आणि सांपार्श्विक दराप्रमाणे सदर थकीत त्यांच्या संबंधित तारखेपासून लागू होतील.

अ. क्र.	करार क्र.	कर्जाचे स्वरूप	कर्जदारांचे	१३(२) सूचनेनुसार थकीत	सूचनेची तारीख	तारण मत्तेचा तपशील
१	९१४६३४५०	सीबीएल गृह कर्ज	१. सौ. विजया इंगळे २. श्री. सुनिल एस. इंगळे ३. श्री. शशिकांत डी. बोधारे	रु. ३,३६,८५७.३२	२७/११/२०१९	फ्लॅट क्र. २०३, इमारत क्र. सी–७, २रा मजला, वीणा सागर सीएचएस लि., वीणा नगर, एल. बी. एस. मार्ग, सरस्वती को–ऑपरेटिव्ह बँक समोर, मुलुंड (प.), मुंलुड–४०० ०८०.
२	९०१५२१७१	सीबीएल गृह कर्ज	१. श्री. जितेंद्र गुप्ता २. श्री. दीपक ए. गुप्ता	रु. १०,१३,८९५.२३	३०/०७/२०१९	फ्लॅट क्र. ४०२, ४था मजला, संकल्प II अशी ज्ञात इमारत, इमारत क्र. ६९, पूनम सागर कॉम्प्लेक्स, शांती नगर, मिरा रोड (पूर्व), ठाणे.
३	५०२०००२९ ३८७१०२	तारण कर्ज ड्रॉप लाईन ओव्हर ड्राफ्ट	१. मिराडोर कंस्ट्रक्शन २. श्री. विजय पवार ३. श्री. धनश्री विजय पवार	रु. २१,००,७८१.५४	२७/११/२०१९	दुकान क्र. ०१४, तळ मजला, इमारत क्र. २ अ‍ॅव्हेन्यू–१, रुस्तमजी एव्हरशाईन ग्लोबल सिटी, विरार (पश्चिम), महाराष्ट्र–४०१ ३०३.

वरील सूचीत नमूद करण्यात आल्याप्रमाणे **एचडीएफसी बँक लि.** यांच्याकडील थकीत रक्कम त्यांच्या संबंधित तारखेपासूनचे सांपार्श्विक दरावरील व्याज आणि इतर रक्कम, आकार इ. ची परतफेड सदर सूचना प्रकाशनाच्या ६० दिवसांत करण्याचे तुम्हाला सांगण्यात येत आहे, कसूर केल्यास निम्नस्वाक्षरीकार सरफैसी अ‍ॅक्टच्या कलम १३(४)/१४ अंतर्गत वरील नमूद गहाण असलेल्या मिळकतीसंबंधी **एचडीएफसी बँक लि.** यांचे थकीत मोकळे करण्याची कार्यवाही करण्यास भाग असतील. पुढे सदर अ‍ॅक्टच्या कलम १३(१३) अंतर्गत सदर तारण मत्ता विक्री/भाडेपट्टा संदर्भात वा अन्य स्वरुपात हस्तांतरित करण्यास तुम्हाला मनाई आहे. कृपया नोंद घ्यावी की, जर तारण धनको तारण मत्तेच्या विक्रीकरिता निश्चित केलेल्या तारखेपूर्वी समाधानी झाले तर तारण मत्ता विक्री किंवा हस्तांतरित करण्यात येणार नाही आणि अ‍ॅक्टच्या कलम १३(८) अन्वये निदिष्टानुसार त्यावतीने तारण धनको द्वारे पुढील पावले उचलली जाणार नाहीत.

सही/–
दिनांकः १८/१२/२०१९ **प्राधिकृत अधिकारी**
स्थळः मुंबई **एचडीएफसी बँक लि.**

जाहीर नोटीस

याद्वारे सर्व संबंधितांना नोटीस देण्यात येत आहे की मे. जोशी मोहनलाल हरीराम अँड कंपनी, भागीदार फर्म, पत्ता : सीटीएस नं. ६/ए, पहाडी गोरेगाव, राम नगर, मालाड (प), मुंबई–४०००६४, व्यवसाय मुंबई सबर्बन येथे खाद्य तेलाची विक्री व खरेदी, त्यांच्या सध्याच्या भागीदारांद्वारे **१) वसंत कुमार करसनजी जोशी २) चेतन मोहनलाल जोशी ३) शैलेश हरिराम जोशी आणि ४) नवीन मोहनलाल जोशी,** करीत आहे, जे खाली दिलेल्या शेड्यूलमध्ये सविस्तर वर्णन दिलेल्या मालमत्तेचे भाडेकरू असून , त्यांनी सदर शेड्यूल मालमत्ता माझ्या अशीलांना हस्तांतरीत व असाइन (अभिहस्तांकित) करण्याचे मान्य केलेले आहे, जे सक्षम अधिकाऱ्यांच्या अनुमतीच्या अधीन असेल.
वर उल